<u>प्रेसनोट</u> दि.२१/०४/२०१९

**दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे**

**"कायदा व सुव्यवस्थेसाठी पोलीसांचा रुटमार्च"**

दि.२३/०४/२०१९ रोजी पुणे शहर लोकसभा मतदार संघात होणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांमध्ये कायदा व सुव्यवस्थेबद्दल विश्वास निर्माण व्हावा व मतदाराला निर्भयपणे मतदान करता यावे या करीता दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने शाहु कॉलेज-जनता वसाहत-गणेश मळा-दत्तवाडी-म्हसोबा चौक-मांगिरबाबा चौक- ना सी फडके चौक-नियालम पुल-पर्वती गाव-गजानन महाराज मंदिरचौक असा पायी रुटमार्च आयोजित करण्यात आला होता या रुटमार्चमध्ये ०२ पोलीस निरीक्षक, १२ सहाय्यक पोलीस निरीक्षक/पोलीस उप निरीक्षक व १८६ पोलीस कर्मचारी व होमगार्ड असे सामील झाले होते.

या प्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे यांनी नागरिकांना आवाहन केले की, दि.२३/०४/२०१९ रोजी मतदान करण्याकरीता कोणाच्याही दबावाला बळी न पडता मुक्तपणे मतदान करावे, मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे आपणास काही आक्षेपार्ह घटना समजल्यास त्याची माहिती निर्भीडपणे पोलीसांना कळवावी.

**(देविदास घेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पो.स्टे. पुणे शहर

